# मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई.

कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय

**रु.नं.५३९, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**दुरध्वनी क्रमांक-६६४०५४८५, फॅक्स : (०२२) २६५९२०५८.**


जा.क्र.का.अ./शहर/मुंझोसुमं/ /२०२१

दिनांक :-

## कंत्राटदारांकरिता सुचना

कार्यकारी अभियंता (शहर) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या द्वारे खालील उप-कामाकरिता बाजार दर प्राप्त करण्यासाठी दुकान व अस्थापना आणि जी.एस.टी. क्र. यांची नोंदणी केलेल्या अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदार, संस्था, कलावंत, अधिकृत विक्रेता, यांचेकडुन देकार मागवीत आहेत. दुकान व अस्थापना आणि जी.एस.टी.क्र. यांची नोंदणी केलेल्या प्रमाणित प्रतीच्या सादरीकरणानंतर रिक्त देकार प्रपत्र दि.०१.०४.२०२१ ते १५.०४.२०२१ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत या कार्यालयात उपलब्ध करण्यात येतील. मोहरबंद देकार सदर कार्यालयात रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे पुर्व, मुंबई-४०००५१. येथे दि. १५.०४.२०२१ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत जमा करण्यात यावेत. मोहर बंद देकार सदर दिवशी जर शक्य असल्यास अर्थात दि. १५.०४.२०२१ रोजी दुपारी ३:३० वाजता उघडण्यात येतील.

**कामाचे नाव :- हुतात्मा शिवराम हरी राजगुरु चौक, फोर्ट, मुंबई या मधील उपकामे येथे सुशोभीकरण करणे.**

उप-काम
१. हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे चेह-याचे पितळा मधील नक्षीचित्र.
२. गंज विरहीत धातुमधील दोन मशाली.
३. स्वतंत्र संग्रामातील माहिती दर्शविणारा तक्ता QR Code मध्ये.
४. स्वतंत्र संग्रामाची संकल्पनाचे कोरीव काम (Steel Etching)
५. हुतात्मा शिवराम हरी राजगुरु चौक अक्षरी नाव Steel Block letters मध्ये.
६. हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्म व मृत्यु दिनंक Steel Block letters मध्ये.

रिक्त देकार प्रपत्र करिता लागणारे शुल्क :- रु. शुन्य

१) मोहरबंद लिफाफ्या मधील देकार वरील नमुद सदर कार्यालयामधुन प्राप्त करता येतील व देकारकर्ता यांचे उपस्थितीत, जर शक्य असल्यास सदर दिवशी उघडण्यात येतील.
२) देकारकर्ता यांनी त्यांचे देकार हे त्यांच्या लेटरहेड वरती व देकार प्रपत्रामध्ये मोहरबंद लिफाफ्या मध्येच सादर करावीत.
३) देकारकर्ता यांनी त्यांचे दर दोन्ही अक्षरी आणि अंकात पक्क्या शाईने नमुद करावेत, अंकात आणि अक्षरात असलेल्या दरामध्ये फरक आढळल्यास जो दर कमी असेल तो दर ग्राह्य धरला जाईल.
४) कार्यकारी अभियंता शहर यांच्याकडे देकार स्विकृतीबाबत अधिकार आरक्षित असतील तसेच कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणतेही देकार रद्द करण्याचे अधिकार आरक्षित असतील.
५) निविदाकृत देकार असलेल्या कामाचे नाव देकार असलेल्या लिफाफ्यावर स्पष्टपणे नमुद करावेत.
६) देकारमध्ये जी.एस.टी.अंतर्भुत नसावे.
७) मोहरबंद लिफाफ्या मधील देकार हे फक्त बाजार दर प्राप्त करण्याकरिता मागविण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता (शहर),**
**मुं.झो.सु.मंडळ मुंबई**